# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २०५ /२०२०**

**तक्रारकर्ता - श्रीमती जेनिफर रेबेलो**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलक एच/पश्चिम**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग कार्यालय इमारत,
२nd हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग कार्यालय इमारत,
२nd हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०६९.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.११.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (Video Conference द्वारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु. मा. आ. नों. क्र. ३९९१/२०१८ रा. मा. आ. अपील क्र. १५७६/ २०१९ प्रकरणी आयोगाने दि. ११.०३.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज कलम १८ अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरित करण्यात येत आहे."*

२. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलक एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, खार (प), मुंबई - ४०० ०६९ यांच्याकडून दि.२४.०९.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलक एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, खार (प), मुंबई - ४०० ०६९ यांनी दि. २१.१०.२०२० रोजी आयोगास अहवाल सादर केला.

३. तक्रारकर्ता यांनी द्वितीय अपीलाची सुनावणी Video Conference द्वारे घेण्याची आयोगास विनंती केली. तक्रारकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी Video Conference उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

४. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची सुनावणी नोटीस आयोगाच्या कार्यालयास परत आलेली आहे. आयोगाच्या कार्यालयाने उचित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना पुन्हा नव्याने योग्य त्या पत्यावर नोटीस निर्गमित करावी. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १२.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission * Greater Mumbai *

26-11-2025

**मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २०५/२०२०**
**तक्रारकर्ता श्रीमती जेनिफर रेबेलो**
**सुनावणी दिनांक : १२.०१.२०२६ (In continuation of order dt २६.११.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे ईमेलव्दारे पत्र दि. १२.०१.२०२६ आयोगास सादर करुन नमुद केले की, बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५- २६ च्या अनुषंगाने ते निवडणूक कर्तव्यामध्ये व्यस्त असल्याने त्यांनी ऑनलाईन सुनावणीची मागणी केली. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांना ईमेलव्दारे ऑनलाईन सुनावणीसाठी लिंकही देण्यात आली. परंतु जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०३.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : १३.०१.२०२६**

13-1-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम - २०५/२०२०**

**तक्रारकर्ता - श्रीमती जेनिफर रेबेलो**

**सुनावणी दिनांक : ०५.०३.२०२६ (In continuation of order dt १३.०१.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे ईमेलद्वारे पत्र दि.१२.०१.२०२६ आयोगास सादर करुन नमूद केले की, बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने ते निवडणूक कर्तव्यात व्यस्त असल्याने त्यांनी ऑनलाईन सुनावणीची मागणी केली. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांना ईमेलद्वारे ऑनलाईन सुनावणीसाठी लिंकही देण्यात आली. परंतु जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

२. तक्रारकर्ता यांनी तक्रारीची सुनावणी Video Conference द्वारे घेण्याची आयोगास विनंती केली. तक्रारकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. आजच्या सुनावणीच्या वेळी ऑनलाईन लिंक देऊनही तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांना शेवटची संधी म्हणून त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०४.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप CWM 6-3-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०६.०३.२०२६**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २०५/२०२०**
**तक्रारकर्ता श्रीमती जेनिफर रेबेलो**
**सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६ (In continuation of order dt ०६.०३.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्याकरिता आणखी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांना शेवटची संधी म्हणून त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलन एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई (व्ही.सी.माध्यमाव्दारे) उपस्थित असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलन एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याशी संबंधीत आहे.

३. आयोगासमोरील दि. ०५.०३.२०२६ रोजीच्या सुनावणी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई उपस्थित होते. परंतु, आजचे सुनावणीचे सुनावणी नोटीस न मिळाल्याने ते आज अनुपस्थित आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर निर्धारक व संकलन एच/पश्चिम विभाग तसेच जन माहिती अधिकारी (इ व का) एच/पश्चिम विभाग यांनी उपस्थित रहावे.

४. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना सुध्दा सुनावणी नोटीस निर्गमित करावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.०४.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ०८.०४.२०२६** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत:- जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.